॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 28 — ASHTAVIMSHATITAMODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

The twenty-eighth chapter *opens some time after the previous events, recounting how King Bhartari has returned to Avanti and remains deeply entangled in his love for Queen Pingala. In an intimate palace exchange, Bhartari showers Pingala with declarations of their absolute oneness, prompting the queen to fiercely vow that she could never survive him as a widow. Unsettled by her intense words, Bhartari warns her that death is unpredictable and that such ultimate resolve is easier spoken than tested. Later, while hunting alone in the forest and consumed by their conversation, the king decides to test her loyalty by faking his own demise. He slaughters a deer, drenches his royal garments in its blood, and dispatches a servant to the palace with a false report that a tiger has killed him.*

Tragically, a devastated Pingala immediately commits sati, throwing herself into an open fire pit before anyone can intervene. Bhartari races back in horror from the wilderness but arrives only to find his queen already reduced to ashes. Inconsolable, the guilt-ridden king refuses food and sits motionlessly by the cremation ground for twelve long years, completely abandoning his royal duties. His brother, King Vikram, assumes the throne and visits the pyre daily, pleading with him to return to life, but Bhartari cannot be moved. Moved by this agonizing, prolonged grief, the god Mitra-Varuni appeals to the sage Dattatreya on his son’s behalf. Dattatreya promises that Machindranath’s foremost disciple, Gorakshanath—who is currently on a planetary pilgrimage—will eventually arrive to deliver Bhartari from his sorrow and guide him to the true spiritual path.

Ovee 1

जयजयाजीजगदुद्धारा । अखिल निरंजना निर्विकारा । भक्तमानसचकोरचंद्रा । प्रेमांबुधारा ओसरसी ॥

Transliteration

Jaya jayaa jee Jagaduddhaaraa | Akhila niranjanaa nirvikaaraa | Bhaktamaanasa-chakora-chandraa | Premaam-budhaaraa osarasee ||

Ovee 2

तरी तूं असतां कृपाळु आई । माय माझे विठाबाई । तरी आतां ग्रंथप्रवाहीं । येऊनियां बैसे गे ॥

Transliteration

Taree too asataa kripaalu aaee | Maaya maajhe Vithaabaaee | Taree aataa grantha-pravaahee | Yeuniyaa baise ge ||

Ovee 3

मागिले अध्यायीं प्रेमेंकरुन । वैभवीं मेळविला राव विक्रम । भर्तरीसंगमीं पिंगलालग्न । दत्तानुग्रह लाधला ॥

Transliteration

Maagile adhyaayee premen-karunu | Vaibhavee melavilaa raava Vikramu | Bhartaree-sangamee Pingalaa-lagnu | Datta-anugraha laadhalaa ||

Ovee 4

उपरी मृगया करुनी । अवंतिकास्थाना जाऊनी । राजधामी कनकासनीं । सभामंडपीं बैसला ॥

Transliteration

Uparee mrigayaa karunee | Avantikaa-sthaanaa jaauunee | Raaja-dhaamee kanaka-aasanee | Sabhaa-mandapee baisalaa ||

Ovee 5

क्षणैक बैसूनि त्वरितात्वरित । पाकशाळे गेला नृपनाथ । पक्वान्न सेवूनि अंतःपुरांत । पिंगलागृहीं संचरला ॥

Transliteration

Kshanaika baisuni tavaritaa-tvaritu | Paakashaale gelaa nripanaathu | Pakvaanna sevuni antah-puraantu | Pingalaa-grihee sancharalaa ||

Ovee 6

कनकामंचकीं सुमनशेजीं । राव बैसवी पिंगला अर्जी । षोडशोपचारेंकरुनि पूजी । श्रद्धापूर्वक पिंगला ॥

Transliteration

Kanakaamanchakee sumana-shejee | Raava baisavee Pingalaa arjee | Shodashopachaarenkaruni poojee | Shraddhaa-poorvaka Pingalaa ||

Ovee 7

परम प्रीतीं भावारुढ । रायें दर्शविलें चित्तीं कोड । मग करी कवळूनि स्नेहपाडें । निकट घेत पिंगला ॥

Transliteration

Parama preetee bhaavaarudhu | Raaye darshavile chittee kodu | Maga karee kavaluni sneha-paade | Nikata gheta Pingalaa ||

Ovee 8

तीतें वामांकीं बैसवोन । परम प्रीतीनें घेत चुंबन । वाचेनें म्हणे तुजसमान । अन्य दारा नावडती ॥

Transliteration

Teete vaamaankee baisavonu | Parama preeteene gheta chumbanu | Vaachene mhane tuja-samaanu | Anya daaraa naavadatee ||

Ovee 9

अगे पिंगले माझें मन । भावी मम देहीचें ऐक्यरत्न । जैसे मित्र आणि रश्मिचिन्ह । ऐक्यदेहीं मिरवती ॥

Transliteration

Aghe Pingale maajhe manu | Bhaavee mama deheenche aikya-ratnu | Jaise Mitra aani rashmi-chinhu | Aikya-dehee miravatee ||

Ovee 10

कीं राजमौळी तेजें आगळा । द्वितीये शोभली त्याची कळा । तेवीं मातें तूं पिंगला । मम चित्तावरी धावें ॥

Transliteration

Kee raaja-maulee teje aagalaa | Dviteeye shobhalee tyaachee kalaa | Tevee maate too Pingalaa | Mama chittaa-varee dhaave ||

Ovee 11

अगे हे पिंगले माझा भाव । पिंगलाभर्तरी ऐक्यनांव । एकचि देही मज वाढवी । भासे भास शुभानने ॥

Transliteration

Aghe hey Pingale maajhaa bhaavu | Pingalaa-Bhartaree aikya-naavu | Ekachi dehee maja vaadhavee | Bhaase bhaasa shubhaanane ||

Ovee 12

जैशी शर्करा आणि गोडी । नामें भिन्न परी ऐक्यप्रौढी । तेवीं तूं पिंगला माझे पाठीं । भासे भास शुभानने ॥

Transliteration

Jaishee sharkaraa aani godee | Naame bhinna paree aikya-praudhee | Tevee too Pingalaa maajhe paathee | Bhaase bhaasa shubhaanane ||

Ovee 13

जैसा उदधी आणि लहरी । परी ऐक्यता सागरीं । तेवीं मातें तूं सुंदरी । भास भाससी शुभानने ॥

Transliteration

Jaisaa udadhee aani laharee | Paree aikyataa saagaree | Tevee maate too sundaree | Bhaasa bhaasasee shubhaanane ||

Ovee 14

ऐसें म्हणूनि परम प्रीतीं । पुन्हां चुंबन घेत नृपती । मग भोगूनि सकाम रीती । संतुष्ट चित्तीं मिरवला ॥

Transliteration

Aise mhanuni parama preetee | Punhaa chumbana gheta nripatee | Maga bhoguni sakaama reetee | Santushta chittee miravalaa ||

Ovee 15

मग विचार सुचला एक गहन । आनंदें बैसती प्रीतीकरुन । बैसल्या पिंगला बोलूनि वचन । विडा त्रयोदशगुणी देतसे ॥

Transliteration

Maga vichaara suchalaa eka gahanu | Aanande baisatee preetee-karunu | Baisalyaa Pingalaa boluni vachanu | Vidaa trayodasha-gunee detase ||

Ovee 16

म्हणे हे महाराजा नृपवरा । मम देहींचे प्राणप्रियेश्वरा । मम मानसचकोरचंद्रा । प्रेमांबुधारा मिरवतसे ॥

Transliteration

Mhane hey Mahaaraajaa nripavaraa | Mama deheenche praana-priyeshvaraa | Mama maanasachakora-chandraa | Premaambudhaaraa miravatase ||

Ovee 17

तरी तुम्हां आम्हां गांठी । गांठी गांठिल्या त्या परमेष्ठीं । गांठिल्या परी चित्तदेठीं । ऐक्यभास भासतसे ॥

Transliteration

Taree tumhaa aamhaa gaanthee | Gaanthee gaanthilyaa tyaa Parameshthee | Gaanthilyaa paree chitta-dethee | Aikya-bhaasa bhaasatase ||

Ovee 18

जैसें लवण उदकीं मिश्रित । भिन्न न दावी दृष्टींत । तन्न्याये ऐक्यचित्त । रावराणी शोभत ॥

Transliteration

Jaise lavana udakee mishritu | Bhinna na daavee drishteentu | Tannyaaye aikya-chittu | Raava-raanee shobhatu ||

Ovee 19

तरी ऐसा मिश्रित अर्थ । उदया पावला असे ऐक्यचित्त । परी नेणूनि परम कृतांत । जगामाजी मिरवतसे ॥

Transliteration

Taree aisaa mishrita arthu | Udayaa paavalaa ase aikya-chittu | Paree neniuni parama Kritaantu | Jagaa-maajee miravatase ||

Ovee 20

चित्तीं चित्तभय काया । हरण करीत असे राया । तरी नेणों आपण विषयचिंतें या । बुद्धि जरी संचरली ॥

Transliteration

Chittee chitta-bhaya kaayaa | Harana kareeta ase raayaa | Taree neno aapana vishaya-chinte yaa | Buddhi jaree sancharalee ||

Ovee 21

संचरतां परी एक त्यांतें । मातें दिसत उचितार्थ । तुम्हांआधीं मातें मृत्यु । सुगम चित्ता वाटतसे ॥

Transliteration

Sancharataa paree eka tyaante | Maate disata uchitaarthu | Tumhaan-aadhee maate mrityu | Sugama chittaa vaatatase ||

Ovee 22

तरी हें ऐसें इच्छिल्याप्रमाण । ईश्वरसत्तें जरी आलें घडोन । मग परम बरवी दैवीवान । जगीं असें मी एक ॥

Transliteration

Taree hey aise ichchilyaapramaanu | Eeshvara-satte jaree aale ghadonu | Maga parama baravee daiveevaanu | Jagee ase mee eku ||

Ovee 23

ऐसें बोलतां शुभाननी । राव ऐकूनि बोले वाणी । नेणों सखे ईश्वरकरणी । पुढील कांहीं वदवेना ॥

Transliteration

Aise bolataa shubha-aananee | Raava aikuni bole vaanee | Neno sakhe Eeshvara-karnee | Pudheela kaanhee vadavenaa ||

Ovee 24

मजआधीं तूं कामिनी । मृत्यु पावों इच्छिसी मनीं । परंतु नेणो निर्दयपणीं । मित्रात्मज मिरवतसे ॥

Transliteration

Maja-aadhee too kaaminee | Mrityu paavo ichchisee manee | Parantu neno nirdayapanee | Mitraatmaja miravatase ||

Ovee 25

तो कदा न जाणे वेदविधी । सदा वर्तसे बिघडबुद्धीं । नेणों मज मृत्यु तुजआधीं । आल्या काय करिशील ॥

Transliteration

Toh kadaa na jaane Veda-Vidhee | Sadaa vartase bighada-buddhee | Neno maja mrityu tuja-aadhee | Aalyaa kaaya karisheelu ||

Ovee 26

ऐसें ऐकून वदे पिंगला । नेणों कैसें असे जी भाळां । रेखिली विधीनें अकळ कळा । कळत नाहीं महाराजा ॥

Transliteration

Aise aikuni vade Pingalaa | Neno kaise ase jee bhaalaa | Rekhilee Vidheene akala kalaa | Kalata naahee Mahaaraajaa ||

Ovee 27

परी ऐशा घडल्या गोष्टी । मी रहाणार नाहीं महींपाठीं । देह दाहूनियां हव्यवाटीं । गमन करील तुम्हांसह ॥

Transliteration

Paree aishaa Ghadalyaa goshtee | Mee rahaanaara naahee maheempaathee | Deha daahuniyaa havya-vaatee | Gamana kareela tumhaan-saha ||

Ovee 28

राव ऐकूनि बोले वचन । पुरे आतां तुझें बोलणें । प्राणांहूनि प्रिय कोण । घात त्याचा करवेना ॥

Transliteration

Raava aikuni bole vachanu | Pure aataa tujhe bolane | Praanaanhuni priya konu | Ghaata tyaachaa karavenaa ||

Ovee 29

तरी हे बोल उगलेचि फोल । माझिया तोषाचें करिसी मोल । परी समय येतां तव पाऊल । मागेंचि धांव घेणार ॥

Transliteration

Taree hey bola ugalechi pholu | Maajhiyaa toshaache karisee molu | Paree samaya yetaa tava paaoolu | Maagenchi dhaava ghenaaru ||

Ovee 30

तरी अनुभव माझिये चित्ता । सहज आहे मजला पाहतां । अगे राज्यासनीं विपुल वार्ता । सेवक श्रवण माझे करविती ॥

Transliteration

Taree anubhava maajhiye chittaa | Sahaja aahe majalaa paahataa | Aghe raajyaasanee vipula vaartaa | Sevaka shravana maajhe karavitee ||

Ovee 31

करविती परी कैशा रीतीं । समरंगणींचा भाव दाविती । शत्रूअनलीं प्राणाहुती । वेंचूं ऐसे म्हणताती ॥

Transliteration

Karavitee paree kaishaa reetee | Samaranganeenchaa bhaava daavitee | Shatroo-analee praanaahutee | Venchoo aise mhanataatee ||

Ovee 32

तरी समय पडतां दृष्टीं । जीवित्व रक्षिती बारावाटीं । मग कोण कोठील मोह पोटीं । जीवित्वाचा वरिती गे ॥

Transliteration

Taree samaya padataa drishtee | Jeevitva rakshitee baaraa-vaatee | Maga kona kotheela moha potee | Jeevitva-achaa varitee ge ||

Ovee 33

तरी हें तैसें तुझें बोलणें । दावीत मातें चांगुलपण । परी समय पडतां अर्थ भिन्न । दुसराचि आहे गे ॥

Transliteration

Taree hey taise tujhe bolane | Daaveeta maate chaangula-panu | Paree samaya padataa artha bhinnu | Dusaraachi aahe ge ||

Ovee 34

कीं बहुरुपियाचे खेळमेळीं । होऊनि बैसती महाबळी । परी ते शूरपणाची नव्हाळी । समरभूमीं चालेना ॥

Transliteration

Kee bahurupiyaache khela-melee | Houni baisatee mahaa-Balee | Paree tey shoorapana-achee navhaalee | Samara-bhoomee chaalenaa ||

Ovee 35

कीं श्वानपुच्छाची कैशी उग्रता । परी हार तेचि पडे बळी देखतां । जैसी पालीची दृष्टी देखतां । वृश्चिक नांगी उतरीतसे ॥

Transliteration

Kee shvaana-puchchaachee kaishee ugrataa | Paree haara techi pade Balee dekhataa | Jaisee paaleechee drishtee dekhataa | Vrishchika naangee utareetase ||

Ovee 36

तन्न्यायें तव बोलणें । मातें दिसतें सहजस्थितीनें । ऐसें बोलतां भर्तरीनंदने । पिंगला वदे स्वामीसी ॥

Transliteration

Tannyaaye tava bolane | Maate disate sahaja-sthiteene | Aise bolataa Bhartaree-nandane | Pingalaa vade svaameesee ||

Ovee 37

म्हणे महाराजा प्राणेश्वरा । या बोलाचा वाग्दोरा । कंठीं बांधिला आहे नरा । काया वाचा मानसीं ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa praaneshvaraa | Yaa bolaachaa vaagdoraa | Kanthee baandhilaa aahe naraa | Kaayaa vaachaa maanasee ||

Ovee 38

तरी आतां व्यर्थ बोलून । नेणों घडेल अर्थ कोण । ईश्वरसत्तेचें प्रमाण । ब्रह्मादिकां कळेना ॥

Transliteration

Taree aataa vyartha bolunu | Neno ghadela artha konu | Eeshvara-satteche pramaanu | Brahma-aadikaa kalenaa ||

Ovee 39

परी माझिये भावनेऐसें । येत आहे स्वचित्तास । विधवा शब्द शरीरास । लिप्त होणार नाहीं कीं ॥

Transliteration

Paree maajhiye bhaavane-aise | Yeta aahe svachittaasu | Vidhavaa shabda shareeraasu | Lipta honaara naahee kee ||

Ovee 40

जरी म्हणाल कैशावरुन । जरी काया वाचा चित्त मन । तुम्हांलागीं केलें अर्पण । साक्ष असे ईश्वर तो ॥

Transliteration

Jaree mhanaala kaishaa-varunu | Jaree kaayaa vaachaa chitta manu | Tumhaa-laagee kele arpanu | Saaksha ase Eeshvara toh ||

Ovee 41

ईश्वर तो सत्याश्रित । आहे म्हणती सकल जगतीं । तरी वैधव्य शब्द जगमुखांत । मातें लिप्त होणार नाहीं कीं ॥

Transliteration

Eeshvara toh satyaashritu | Aahe mhanatee sakala jagatee | Taree vaidhavya shabda jaga-mukha-antu | Maate lipta honaara naahee kee ||

Ovee 42

असो बीज पेरिलें तैसें फळ । द्रुमकोमादि सकल । तेवीं माझी चाली सरळ । फळ उमटेल तैसेंचि ॥

Transliteration

Aso beeja perile taise phalu | Drumako-maadi sakalu | Tevee maajhee chaalee saralu | Phala umatela taisenchi ||

Ovee 43

ऐसें बोलून निवांतपणीं । स्तब्ध राहिली कामिनी । परी रायाचे अंतःकरणीं । शब्द सदृढ मिरवले ॥

Transliteration

Aise boluna nivaanta-panee | Stabdha raahilee kaaminee | Paree raayaache antah-karnee | Shabda sadridha miravale ||

Ovee 44

मिरवले परी ठेविले मनांत । चमत्कार पाहूं कोणे दिवसांत । असो हे जल्प बहु दिनांत । सारिते झाले प्रीतीनें ॥

Transliteration

Miravale paree thevile manaantu | Chamatkaara paahoo kone divasaantu | Aso hey jalpa bahu dinaantu | Saarite jhaale preeteene ||

Ovee 45

सहज कोणें एके दिवशीं । राव जातसे पारधीसी । मृगया खेळतां विपिनासी । आठव झाला कांतेचा ॥

Transliteration

Sahaja kone eke divashee | Raava jaatase paaradheesee | Mrigayaa khelataa vipinaasee | Aathava jhaalaa kaantechaa ||

Ovee 46

कीं आम्ही उभयतां दोघें जण । बैसलो होतों सुखसंपन्न । तयामाजी मृत्यु बोलोन । निश्चयविलें कांतेनें ॥

Transliteration

Kee aamhee ubhayataa doghe janu | Baisalo hoto sukha-sampannu | Tayaa-maajee mrityu bolonu | Nishchayavile kaantene ||

Ovee 47

कांतेनें झालिया गतप्राण । तुम्हासवें करीन गमन । तरी त्या बोलाचे साचपण । आज पाहूं निश्चयें ॥

Transliteration

Tumhaa jhaaliyaa gatapraanu | Tumhaa-save kareena gamanu | Taree Tyaa bolaache saachapanu | Aaja paahoo nishchaye ||

Ovee 48

ऐसी चित्तीं योजना करुन । मृगया करीत फिरे कानन । तों अकस्मात देखिला नयनें । मृग एक नेटका ॥

Transliteration

Aisee chittee yojanaa karunu | Mrigayaa kareeta phire kaananu | Toh akasmaata dekhilaa nayanu | Mriga eka netakaa ||

Ovee 49

राव देखतां तयापाठीं । लागूनि शीघ्र महीं आर्हाटी । शीणचि त्या जीवीं बहू मेळथाटीं । मृग जीवंत धरियेला ॥

Transliteration

Raava dekhataa tayaa-paathee | Laguni sheeghra mahee aarhaatee | Sheenachi tyaa jeevee bahoo melathaatee | Mriga jeevanta dhiyelaa ||

Ovee 50

धरियेला परी हस्तेंकरुन । तयाची ग्रीवा छेदून । मुकुटासह काढूनि भूषणें । रुधिरें वस्त्रें भिजविलीं ॥

Transliteration

Dhariyelaa paree hastenkarunu | Tayaachee greevaa chedunu | Mukutaasaha kaadhuni bhooshane | Rudhire vastre bhijavilee ||

Ovee 51

भिजवोनियां सेवकाहातीं । देतां झाला शीघ्र नृपती । अन्य भूषण उभवूनि कांती । सुखासनीं बैसला ॥

Transliteration

Bhijavoniyaa sevaka-haatee | Detaa jhaalaa sheeghra nripatee | Anya bhooshane ubhavuni kaantee | Sukhaasanee baisalaa ||

Ovee 52

उत्तम छाया पाहून । तयाखालीं नृप जाऊन । उत्तम चीर कनकवर्ण । मृदु गालिचा अंथरला ॥

Transliteration

Uttama chaayaa pahunu | Tayaa-khaalee nripa jaunu | Uttama cheera kanakavarnu | Mridu gaalichaa antharalaa ||

Ovee 53

तयावरी बैसूनि नृपती । मंडळी दुरावूनि बैसे एकांतीं । परी रुधिरवस्त्रें जयाहातीं । तयालागीं पाचारी ॥

Transliteration

Tayaa-varee baisuni nripatee | Mandalee duraavuni baise ekaantee | Paree rudhiravastre jaya-haatee | Tayaa-laagee paachaaree ||

Ovee 54

म्हणे ही रक्तवस्रें घेऊन । सेवका पिंगलेचें गांठी स्थान । वस्त्रें तीतें गोचर करुन । राव निमाला म्हणावें ॥

Transliteration

Mhane hee raktavasre gheunu | Sevakaa Pingaleche gaanthee sthaanu | Vastre teete gochara karunu | Raava nimaalaa mhanaave ||

Ovee 55

निमाला परी कैसे रीती । जरी पिंगळा बोलेल उक्ती । तरी व्याघ्र संघांनी जीवित्व आहुती । घेऊनियां पळाला ॥

Transliteration

Nimaalaa paree kaise reetee | Jaree Pingalaa bolela uktee | Taree vyaaghra sanghaannee jeevitva aahutee | Gheuniyaa palaalaa ||

Ovee 56

ऐसें वदोनि रायें भृत्यातें । गुप्त पाठविलें अवंतिकेतें । राजसदना जाऊनि भृत्यें । पिंगलेतें विलोकिलें ॥

Transliteration

Aise vadoni raaye bhrityaate | Gupta paathavile Avantikete | Raaja-sadanaa jauni bhritye | Pingalete vilokile ||

Ovee 57

मौळी चीरासह सकळ । रुधिरव्याप्त वस्त्रें सबळ । पुढें ठेवूनि करकमळ । जोडूनियां बोलतसे ॥

Transliteration

Maulee cheeraasaha sakalu | Rudhira-vyaapta vastre sabalu | Pudhe thevuni kara-kamalu | Joduniyaa bolatase ||

Ovee 58

म्हणे जी महाराज महीस्वामिनी । मृगया करीत राव काननीं । अवचित व्याघ्र जाळींतुनीं । उठला राया न कळतां ॥

Transliteration

Mhane jee Mahaaraaja mahee-svaaminee | Mrigayaa kareeta raava kaananu | Avachita vyaaghra jaaleentunee | Uthalaa raayaa na kalataa ||

Ovee 59

मागाहूनि साधूनि उड्डाण । राव धरिला ग्रीवेकारण । धरितांचि हरुनि प्राण । रुधिर पिऊन पळाला ॥

Transliteration

Maagaahuni saadhuni uddaanu | Raava dharilaa greeve-kaaranu | Dharitaanchi haruni praanu | Rudhira piuni palaalaa ||

Ovee 60

आतां त्याचें करुनि दहन । चमू येईल सकळ परतोन । ऐसें पिंगलेनें ऐकून । हृदय पिटी आक्रोशें ॥

Transliteration

Aataa tyaache karuni dahanu | Chamoo yaeela sakala paratonu | Aise Pingalene aikunu | Hridaya pitee aakroshe ||

Ovee 61

हृदय पिटूनि महीवरती । भावें आपटी निष्ठुरगती । अहा म्हणूनि केश हातीं । धरोनियां लुंचीतसे ॥

Transliteration

Hridaya pituni mahee-varatee | Bhaave aapatee nishthuragatee | Ahaa mhanuni kesha haatee | Dharoni-yaa luncheetase ||

Ovee 62

शब्द करुनि अट्टाहास । हंबरडा मारुनि उदास । पुन्हां महीतें मस्तकास । वारंवार आफळीतसे ॥

Transliteration

Shabda karuni attahaasu | Hambaradaa maaruni udaasu | Punhaa maheete mastakaasu | Vaaramvaara aaphaleetase ||

Ovee 63

मृत्तिका घेऊनि टाकी मुखांत । म्हणे हा हा जी प्राणनाथ । मातें कैसे टाकूनि गेलांत । परत्रदेशभुवनासी ॥

Transliteration

Mrittikaa gheuni taakee mukhaantu | Mhane haa jee praana-Naathu | Kaise taakuni gelaantu maate | Paratradesha-bhuvanaasee ||

Ovee 64

अहा महाराजा प्राणेश्वरा । कूपीं कापिला कैसा दोरा । अहा तव प्रीतीचा मोहझरा । आजि कैसा आटला जी ॥

Transliteration

Ahaa Mahaaraajaa praaneshvaraa | Koopee kapilaa kaisaa doraa | Ahaa tava preeteechaa mohajharaa | Aaji kaisaa aatalaa jee ||

Ovee 65

अहो मम प्राणनाथा । मजविण तुम्हां क्षण गमत नव्हता । प्रीती सोडूनि कैसे आतां । परत्र देशा गमलेती ॥

Transliteration

Aho mama praana-Naathaa | Majavina tumhaa kshana gamata navhataa | Preetee soduni kaise aataa | Paratra deshaa gamaletee ||

Ovee 66

ऐसें म्हणोनि आरंबळत । तो अंत:पुरीं समजली मात । स्त्रिया राजाच्या द्वादश शत । आरंबळत पातल्या ॥

Transliteration

Aise mhanoni aarambalatu | Toh antahpuree samajalee maatu | Striyaa raajaa-chyaa dvaadasha shatu | Aarambalata paatalyaa ||

Ovee 67

एक हृदय पिटिती आपुले हस्तीं । एक धांवती महीं पडती । एक ऐकतांचि झाली वरिती । महीलागीं मूर्च्छित ॥

Transliteration

Eka hridaya pititi aapule hastee | Eka dhaavatee mahee padatee | Eka aikataanchi jhaalee varitee | Mahee-laagee moorchchitu ||

Ovee 68

एक हंबरडा फोडूनि ऊर्ध्व । म्हणती आमुचा गेला निध । आतां महीतें स्त्रीवृंद दीनवत झालों कीं ॥

Transliteration

Eka hambaradaa phoduni oordhvu | Mhanatee aamuchaa gelaa nidhu | Aataa maheete streevrindu | Deenavata jhaalo kee ||

Ovee 69

ऐसें म्हणोनि आरंबळती । एकमेकींच्या गळां पडती । हृदय पिटूनि आपटिती । महीलागीं मस्तक तें ॥

Transliteration

Aise mhanoni aarambalatee | Ekamekeenchyaa galaa padatee | Hridaya pituni aapatitee | Mahee-laagee mastaka tey ||

Ovee 70

ऐसा सकळ अंत:पुरांत । कोल्हाळ झाला अद्भुत । परी पिंगला दारा प्रीतीं बहुत । शोक करी आक्रोशें ॥

Transliteration

Aisaa sakala antahpuraantu | Kolhaala jhaalaa adbhutu | Paree Pingalaa daaraa preetee bahutu | Shoka karee aakroshe ||

Ovee 71

म्हणे महाराजा निढळवाणी । मज कैसे गेलेत जी सांडोनी । मोहाचा सकळ तरणी । लोपोनियां महाराजा ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa nidhalavaanee | Maja kaise geleta jee saandonee | Mohaachaa sakala taranee | Loponiyaa Mahaaraajaa ||

Ovee 72

बाळाहूनि मोह अत्यंत । मजविषयीं पाळीत होतांत । तो मोह दवडूनि निष्ठुरवत । सांडूनि कैसे गेलात ॥

Transliteration

Baalaa-huni moha atyantu | Majavishayee paaleeta hotethu | Toh moha davaduni nishthuravaru | Saanduni kaise gelaatu ||

Ovee 73

अहो तुम्ही राया सिंहासनीं । बैसत असतां राजकारणीं । परी मम स्मरण होतां मनीं । या धांवूनि सदनांत ॥

Transliteration

Aho tumhee raayaa sinhaasnee | Baisata asataa raaja-kaaranee | Paree mama smarana hotaa manee | Yaa dhaavuni sadanaantu ||

Ovee 74

ऐसें म्हणोनि धरणीवरी शरीर । पिंगला टाकी वारंवार । आजि सकळ सांडोनि राज्यभार । कैसा गेलासी महाराजा ॥

Transliteration

Aise mhanoni dharaneevaree shareeru | Pingalaa taakee vaaramvaaru | Aaji sakala saandoni raajya-bhaaru | Kaisaa gelaasee Mahaaraajaa ||

Ovee 75

पाहूनि माझें मुखमंडन । पुन्हां सेविसी राज्यासन । मोह आजि सकळ सांडोन । कैसा गेलासी महाराजा ॥

Transliteration

Pahuni maajhe mukha-mandanu | Punhaa sevisee raajyaasanu | Moha aaji sakala saandonu | Kaisaa gelaasee Mahaaraajaa ||

Ovee 76

अहा पिंगला अंडजखाणी । कोठें गेलीसे मम पक्षिणी । दाही दिशा ओस करोनी । अचर रानीं चरावया ॥

Transliteration

Ahaa Pingalaa andaja-khaanee | Kothe geleese mama pakshinee | Dahee disha osa karonee | Achara raanee charaavayaa ||

Ovee 77

मम पाडसासी हरिणी । परत्र तृण गोड पाहुनी । तिकडेचि गुंतली लोभेकरुनी । माझा लोभ सांडोनियां ॥

Transliteration

Mama paadasaasee harinee | Paratra trina goda paahunee | Tikadechi guntalee lobhe-karunee | Maajhaa lobha saandoniyaa ||

Ovee 78

अहा मज आंधळ्याची काठी । हिसकूनि नेली निर्दयें पोरटी । कीं क्षुधिताची अन्नवाटी । जिंतूनि नेली भणंगे ॥

Transliteration

Ahaa maja aandhalyaachee kaathee | Hisakuni nelee nirdaye poratee | Kee kshudhitaachee anna-vaatee | Jintuni nelee bhanange ||

Ovee 79

अहा राया मजवांचून । तूतें गमत नव्हतें एक क्षण । आजि निष्ठुर मन करुन । कैसा गेलासी महाराजा ॥

Transliteration

Ahaa raayaa majavaanchunu | Toote gamata navhate eka kshanu | Aaji nishtura mana karunu | Kaisaa gelaasee Mahaaraajaa ||

Ovee 80

अहा राया उत्तम पदार्थ । जो महीलागीं उत्पन्न होत । तो मम आधीं नृपनाथें । भक्षिला नाहीं कधीं कीं ॥

Transliteration

Ahaa raayaa uttama padaarthu | Jo mahee-laagee utpanna hotu | Toh mama aadhee nripa-naathe | Bhakshilaa naahee kadhee kee ||

Ovee 81

मातें बैसवोनि निजअंकास । मुखीं ओपित होतां ग्रास । ऐसेंपरी सांडोनि प्रीतींस । परत्र कैसे गेलात ॥

Transliteration

Maate baisavoni nija-ankaasu | Mukhee opita hotaa graasu | Aise-paree saandoni preeteensu | Paratra kaise gelaatu ||

Ovee 82

ऐसेपरी नाना गुण । आक्रंदतसे आठवून । मग ते सेवकांतें पाचारुन । शय्यासाहित्य करवीतसे ॥

Transliteration

Aise-paree naanaa gunu | Akrandatase aathavunu | Maga tey sevakaante paachaarunu | Shayyaa-saahitya karaveetase ||

Ovee 83

रायमौळींचा चीरमुकुट । परिधानी कबरीं अलोट । स्फुरण दाटोनि मग बळकट । उत्तम चीरीं कवळिला ॥

Transliteration

Raaya-mauleenchaa cheera-mukutu | Paridhaanee kabaree alotu | Sphurana daatoni maga balakatu | Uttama cheeree kavalilaa ||

Ovee 84

स्वामीचें वस्त्र परिधान करुन । घेती झाली सतीचें वाण । स्मशानवाटिकेचें साधन । सिद्ध केलें तत्काळ ॥

Transliteration

Svaamee-che vastra paridhaana karunu | Ghetee jhaalee satee-che vaanu | Smashaana-vaatikeche saadhanu | Siddha kele tatkaalu ||

Ovee 85

मग सकळ समारंभासहित । येती झाली स्मशानवाटिकेंत । अग्निकुंडीं विधानेंकरुनि त्यांत । सबळ अग्नि चेतविला ॥

Transliteration

Maga sakala samaarambha-sahitu | Yetee jhaalee smashaana-vaatikentu | Agni-kundee vidhaanen-karuna tyaantu | Sabala agni chetavilaa ||

Ovee 86

अग्नि लावितां विधानशक्तीं । दाहुनि वर्तला अंगारनीतीं । धगधवोनि कुंडाप्रती । पावक शक्ती दावीतसे ॥

Transliteration

Agni laavitaa vidhaana-shaktee | Daahuni vartalaa angaara-neetee | Dhagadhavoni kundaapratee | Paavaka shaktee daaveetase ||

Ovee 87

ऐसिया प्रकरणीं पेटविला वन्ही । होतां पातली सौदामिनी । अग्निकुंडीं शिळा स्थापोनी । निरोप मागेसर्वांतें ॥

Transliteration

Aisiyaa prakaranee petavilaa vanhee | Hotaa paatalee saudaaminee | Agni-kundee shilaa sthaaponee | Niropa maage sarvaante ||

Ovee 88

सकळां जय देऊनि आशीर्वचन । जय जय भर्ता ऐसें म्हणोन । तुझा देह तुला अर्पण । शीघ्रकाळीं होवो कां ॥

Transliteration

Sakalaa jaya deuni aasheervachanu | Jaya jaya bhartaa aise mhanonu | Tujhaa deha tulaa arpanu | Sheeghra-kaalee hovo kaa ||

Ovee 89

ऐसें म्हणोनि अग्निकुंडांत । सांडिती झाली स्वशरीरातें । परी त्या पावकीं होतां स्थित । गुंडाळोनि गेली सर्वस्वी ॥

Transliteration

Aise mhanoni agni-kundaantu | Saanditee jhaalee sva-shareeraate | Paree tyaa paavakee hotaa sthitu | Gundaaloni gelee sarvasvee ||

Ovee 90

मग ते याचक अपार जन । धन्य म्हणती तियेकारण । स्वहित केलें पिंगलेनें । स्वामी सवें गमूनियां ॥

Transliteration

Maga tey yaachaka apaara janu | Dhanya mhanatee tiye-kaaranu | Svahita kele Pingalene | Svaamee save gamuniyaa ||

Ovee 91

अहा पिंगला ऐसें म्हणती । पवित्र जाया सत्यवती । उदार कर्ण स्वकुळाप्रती । परकुळातें तारील ॥

Transliteration

Ahaa Pingalaa aise mhanatee | Pavitra jaayaa satya-vatee | Udaara Karna sva-kulaapratee | Para-kulaate taareelu ||

Ovee 92

भर्तरीपरी करितां परलोक । विव्हळ चित्तीं करिती शोक । म्हणती आम्हां प्रजेचें दोंदिक । ईश्वरें कैसें नेलें हो ॥

Transliteration

Bhartaree-paree karitaa para-loku | Vivhala chittee karitee shoku | Mhanatee aamhaa prajeche dondiku | Eeshvare kaise nele ho ||

Ovee 93

ऐसें म्हणोनि आक्रंदती । भर्तरी म्हणोनि आठविती । असो पावकीं दोहोनि सती । लोक निघाले माघारे ॥

Transliteration

Aise mhanoni aakrandatee | Bhartaree mhanoni aathaveetee | Aso paavakee dohoni satee | Loka nighaale maaghaare ||

Ovee 94

आपुल्याला सदनीं जाऊन । बैसले असती मुख वाळवोन । अहा भर्तरी ऐसें म्हणोन । श्वासोच्छ्वास सोडिती ॥

Transliteration

Aapulyaalaa sadanee jaunu | Baisale asatee mukha vaalavonu | Ahaa Bhartaree aise mhanonu | Shvaasochchvaasa soditee ||

Ovee 95

आणि राजसदनीं स्त्रियांचा मेळ । शोक करीत अति तुंबळ । तो येरीकडे विपिनीं नृपाळ । मृगया करुनि येतसे ॥

Transliteration

Aani raaja-sadanee striyaanchaa melu | Shoka kareeta ati tumbalu | Toh yeree-kade vipinee nripaalu | Mrigayaa karuni yetase ||

Ovee 96

तो अस्तासी गेला चंडमणी । रात्र दाटली परम विपिनीं । म्हणोनि राजा उठोनी । नगराप्रती चालिला ॥

Transliteration

Toh astaasee gelaa chanda-manee | Raatra daatalee parama vipinee | Mhanoni raajaa uthonee | Nagaraa-pratee chaalilaa ||

Ovee 97

पावकतेजीं दैदीप्यमान । हिलोल मार्गीं प्रदीप्त करुन । जातां भृत्य पाठविला वस्त्रें देऊन । आठव तयाचा पैं झाला ॥

Transliteration

Paavaka-tejee daideepya-maanu | Hilola maargee pradeep-ta karunu | Jaataa bhritya paathavilaa vastre deunu | Aathava tayaachaa pai jhaalaa ||

Ovee 98

राव बैसूनि सुखासनीं । येतां मार्गीं मशाली पेटवोनि । त्यांत चंद्रज्योति शशिसमानी । दिशेलागीं उजळती ॥

Transliteration

Raava baisuni sukhaasanee | Yetaa maargee mashaalee petavoni | Tyaanta chandra-jyoti shashi-samaanee | Dishe-laagee ujalatee ||

Ovee 99

आठव होताचि म्हणे चित्तांत । अबुद्धिपणें स्त्रियांची जात । नेणों गृहीं कैसी मात । घडोनि आली असेल कीं ॥

Transliteration

Aathava hotaachi mhane chittaantu | Abuddhi-pane striyaanchee jaatu | Neno grihee kaisee maatu | Ghadoni aalee asela kee ||

Ovee 100

म्यांही केली मूढपण । शोध केला नाहीं अणिका पाठवोन । सकळ भ्रांतींत चित्त गोंवोन । पाठीं लागलों मृगाच्या ॥

Transliteration

Myaanhee kelee moodha-panu | Shodha kelaa naahee anikaa paathavonu | Sakala bhraanteenta chitta govonu | Paathee laagalo mrigaachyaa ||

Ovee 101

परी मातें दिसतें अहित । मूर्खपणा घेतला स्वपदरांत । ऐसी चिंता करीत । अवंतिके पातला ॥

Transliteration

Paree maate disata ahitu | Moorkha-panaa ghetalaa sva-padaraantu | Aisee chintaa kareetu | Avantike paatalaa ||

Ovee 102

परी यांत श्रोते कल्पना घेती । पिंगला दाहिली पावकशक्तीं । तेव्हां विक्रम नृपती । शोधा कैसा अंतरला ॥

Transliteration

Paree yaanta shrote kalpanaa ghetee | Pingalaa daahilee paavaka-shaktee | Tevhaa Vikrama nripatee | Shodhaa kaisaa antaralaa ||

Ovee 103

आणि तो भृत्य आला वस्त्रें घेऊन । तेणें कैसें पाहिलें निर्वाण । तरी तो पिंगलेते वस्त्रें देऊन । आला होता अरण्यांत ॥

Transliteration

Aani toh bhritya aalaa vastre gheunu | Tene kaise paahile nirvaanu | Taree toh Pingalete vastre deunu | Aalaa hotaa aranyaantu ||

Ovee 104

परी रायाची न पडूनि गांठी । कटक शोधितां महीपाटी । मग तो अस्तमान होतां शेवटीं । कटकालागीं मिळाला ॥

Transliteration

Paree raayaa-chee na paduni gaanthee | Katak shodhitaa mahee-paatee | Maga toh astamaana hotaa shevatee | Kataka-laagee milaalaa ||

Ovee 105

आणि त्या समयीं विक्रम नृपवरें । सेविलें होते मातुलघर । मिथुळेसी जाऊनि समाचार । सत्यवर्म्याचा घेतसे ॥

Transliteration

Aani tyaa samayee Vikrama nripavare | Sevile hote maatula-gharu | Mithulesee jauni samaachaaru | Satya-varmyaachaa ghetase ||

Ovee 106

मग सुमतिप्रधान चमूसहित । शुभविक्रमरायादि प्रज्ञावंत । सकळ मंडळीही ज्ञानभरित । रायासवें गेली ती ॥

Transliteration

Maga sumati-pradhaana chamoo-sahitu | Shubha-vikrama-raayaadi prajnyaa-vantu | Sakala mandalee-hee jnyaana-bharitu | Raayaa-save gelee tee ||

Ovee 107

गृहीं तितुकें स्त्रीमंडळ । ग्रामजनादि रक्षपाळ । सकळ अबुद्धि केवळ । ज्यांतें शक्ति नातुडली ॥

Transliteration

Grihee tituke stree-mandalu | Graama-janaadi raksha-paalu | Sakala abuddhi kevalu | Jyaante shaktee naatudalee ||

Ovee 108

ऐसा समय आला घडून । तों त्यांतही घडलें अपार विघ्न । पिंगला अबुद्धिपणें रत्न । तैं देहान्त पावली ॥

Transliteration

Aisaa samaya aalaa ghadunu | Toh tyaata-hee ghadale apaara vighnu | Pingalaa abuddhi-pane ratnu | Tai dehaanta paavalee ||

Ovee 109

असो पाहिली मार्गवाट । राव भर्तरी चमूनेट । येऊनि अवंतिकेनिकट । ग्रामद्वारीं संचरला ॥

Transliteration

Aso paahilee maarga-vaatu | Raava Bhartaree chamuu-netu | Yeuni Avantike-nikatu | Graama-dvaaree sancharalaa ||

Ovee 110

तंव ते उठोनि द्वारपाळ । रायासमोर आले सकळ । आश्चर्य मानूनि उतावेळ । रायाप्रति वदताती ॥

Transliteration

Tava tey uthoni dvaara-paalu | Raayaa-samora aale sakalu | Aashcharya maanuni utaavelu | Raayaa-prati vadataatee ||

Ovee 111

म्हणती परी कैसे रीतीं । नम्रोत्तरें मंजुळ करिती । मुजरे करुनि निवेदिती । पिंगलेचा वृत्तांत ॥

Transliteration

Mhanatee paree kaise reetee | Namrot-tare manju-la karitee | Mujare karuni niveditee | Pingalechaa vrittaantu ||

Ovee 112

म्हणती महाराजा दिनमणी । भृत्य एक आला वनांतूनी । तो दुश्चिन्ह वदोनि वाणी । ग्राम बुडविला शोकांत ॥

Transliteration

Mhanatee Mahaaraajaa dina-manee | Bhritya eka aalaa vanaantoonee | Toh dush-chinha vadoni vaanee | Graama budavilaa shokaantu ||

Ovee 113

परी त्या शोकाची ऊर्ध्वनळी । सती पडली सुमतिबाळी । नरस्वामिनी पिंगला दवडिली । परत्र देशीं गेलीसे ॥

Transliteration

Paree tyaa shoka-achee oordhva-nalee | Satee padalee sumati-baalee | Nara-svaaminee Pingalaa davadilee | Paratra deshee geleese ||

Ovee 114

तरी तियेची करुनि बोळवण । आतांचि गृहीं आले सकळ जन । स्मशानवाटिका झाली भस्म । एक प्रहर लोटला ॥

Transliteration

Taree tiyechee karuni bolavanu | Aataanchi grihee aale sakala janu | Smashaana-vaatikaa jhaalee bhasmu | Eka prahara lotalaa ||

Ovee 115

ऐसें राव ऐकतां वचन । परम घाबरलें अंतःकरण । मग सुखासनांतूनि उडी टाकून । स्मशानवाटिका पातला ॥

Transliteration

Aise raava aikataa vachanu | Parama ghaabarale antah-karanu | Maga sukhaa-sanaantuni udee taakunu | Smashaana-vaatikaa paatalaa ||

Ovee 116

पातला परी आक्रंदत । अट्टहासें शब्द करीत । अति लगबगें धांवत । स्मशानवाटिकेजवळी पैं ॥

Transliteration

Paatalaa paree akrandatu | Attahaase shabda kareetu | Ati lagabage dhaavatu | Smashaana-vaatike-javalee pai ||

Ovee 117

पातला परी चमू मागें । करीत जातसे अति लाग । सकळ कुळवृद्ध योग । रायालागीं कवळिती ॥

Transliteration

Paatalaa paree chamoo maage | Kareeta jaatase ati laagu | Sakala kula-vriddha yogu | Raayaa-laagee kavalitee ||

Ovee 118

राव जातां स्मशानमहीसी । पहात पिंगलेचे चितेसी । राव विरागी होऊनं मानसीं । उडी टाकूं म्हणतसे ॥

Transliteration

Raava jaataa smashaana-maheesee | Pahaata Pingaleche chitesee | Raava viraagee houna maanasei | Udee taakoo mhanatase ||

Ovee 119

परी ते चमूमेळींचे गृहस्थ थोर । रायासी कवळूनि धरिती समग्र । स्मशानकुंडीचा वैश्वानर । वेष्टूनिया बैसले ॥

Transliteration

Paree tey chamoo-meleenche grihastha thoru | Raayaasee kavaluni dharitee samagru | Smashaana-kundeechaa vaishvaanaru | Veshtuniyaa baisale ||

Ovee 120

परी राव ते उद्देशी । प्राणघात इच्छी मानसीं । परी वेष्टन पडतां शरीरासी । उपाय कांहीं चालेना ॥

Transliteration

Paree raava tey uddeshee | Praana-ghaata ichchee maanasee | Paree veshtana padataa shareeraasee | Upaaya kaanhee chaalenaa ||

Ovee 121

मग बैसल्या ठायीं आरंबळत । महीं मस्तकातें आपटीत । हृदय पिटूनि शोक करीत । मूर्च्छनेलागीं पावतसे ॥

Transliteration

Maga baisalyaa thaayee aarambalatu | Mahee mastakaate aapateetu | Hridaya pituni shoka kareetu | Moorchchanelaagee paavatase ||

Ovee 122

मूच्छा गेलिया पुन्हां उठत । अग्नीं आहुती द्यावया पहात । परी अपार जनांचें वेष्टन बहुत । बळ कांहीं चालेना ॥

Transliteration

Moochchaa geliyaa punhaa uthatu | Agnee aahutee dyaavayaa pahaatu | Paree apaara janaanche veshtana bahutu | Bala kaanhee chaalenaa ||

Ovee 123

उर्ध्व करुनि आपुला माथा । घडीघडी पाहे पिंगलाचिता । अहा म्हणोनि भाळ तत्त्वतां । महीलागीं आफळीतसे ॥

Transliteration

Urdhva karuni aapula maathaa | Ghadee-ghadee paahe Pingalaa-chitaa | Ahaa mhanoni bhaala tattvataa | Mahee-laagee aaphaleetase ||

Ovee 124

आफळूनि आठवी पिंगलेचें गुण । म्हणे कैसी वो गेलीस मज सांडून । माते मृत्युमहीं ठेवून । परत्र कैसी झालीस ॥

Transliteration

Aaphaluni aathavee Pingaleche gunu | Mhane kaisee vo geleesa maja saandunu | Maate mrityu-mahee thevunu | Paratra kaisee jhaaleesu ||

Ovee 125

हे पिंगले तुझें मन । गमत नव्हतें मजवांचून । आतां कैसी निष्ठुर होऊन । परत्रदेशीं गेलीस तूं ॥

Transliteration

Hey Pingale tujhe manu | Gamata navhate majavaanchunu | Aataa kaisee nishthura hounu | Paratra-deshee geleesa too ||

Ovee 126

हे पिंगले तुझा मी पती । नव्हतों शत्रु होतों या जगतीं । कैसें जल्पूनि कुडेमती । भस्म तूतें म्यां केले ॥

Transliteration

Hey Pingale tujaa mee patee | Navhato shatru hoto yaa jagatee | Kaise jalpuni kude-matee | Bhasma toote myaa kele ||

Ovee 127

अहा मी पतित दुष्ट दुर्जन । मूढमतीनें घेतला प्राण । तरी मी तुझा शत्रु पूर्ण । पति न म्हणें पिंगलें ॥

Transliteration

Ahaa mee patita dushta durjanu | Moodha-mateene ghetalaa praanu | Taree mee tujhaa shatru poornu | Pati na mhane Pingale ||

Ovee 128

ऐसें म्हणोनि अंग धरणीं । टाकी हा हा शब्द करोनी । हृदय पिटी दणाणोनी । महीं मस्तक आफळीतसे ॥

Transliteration

Aise mhanoni anga dharanee | Taakee haa haa shabda karonee | Hridaya pitee danaanonee | Mahee mastaka aaphaleetase ||

Ovee 129

अहा पिंगले म्हणोन । हांक मारी अट्टहासेंकरुन । अहा पिंगलें एकदा तव वदन । मज दृष्टी दावीं कां ॥

Transliteration

Ahaa Pingale mhanonu | Haanka maaree attahaasen-karunu | Ahaa Pingale ekadaa tava vadanu | Maja drishtee daavee kaa ||

Ovee 130

अहा पिंगले परत्रभुवनीं । गेलीस मातें तूं सांडोनी । हृदय पिटी दणाणोनी । महीं मस्तक आफळीतसे ॥

Transliteration

Ahaa Pingale paratra-bhuvanee | Geleesa maate too saandonee | Hridaya pitee danaanonee | Mahee mastaka aaphaleetase ||

Ovee 131

हे पिंगले आसनी शयनीं । मज बैसवीत होतीस अंतःकरणीं । आतां माझा विसर धरोनी । कैसी रहासी परत्र ॥

Transliteration

Hey Pingale aasanee shayanee | Maja baisaveeta hoteesa antah-karnee | Aataa maajhaa visara dharonee | Kaisee rahaasee paratru ||

Ovee 132

अहा पिंगले तुजवांचून । सर्वत्र मातें दिशा शून्य । अहा पिंगला माझा प्राण । कुडी टाकून गेलासे ॥

Transliteration

Ahaa Pingale tujavaanchunu | Sarvatra maate dishaa shuunyu | Ahaa Pingalaa maajhaa praanu | Kudee taakuna gelaase ||

Ovee 133

अहा पिंगले तुजवांचून । सर्वत्र मातें दिशा शून्य । शून्यमंदिरीं निद्राशयन । कैसें येईल सांग पां ॥

Transliteration

Ahaa Pingale tujavaanchunu | Sarvatra maate dishaa shuunyu | Shuunya-mandiree nidraa-shayanu | Kaise yaeela saanga paa ||

Ovee 134

अहा पिंगले माझी अधिक । जाणत होतीस तृषाभूक । आतां निष्ठूर मन केलें निक । कैसी सांडोनि तूं ॥

Transliteration

Ahaa Pingale maajhee adhiku | Jaanata hoteesa trishaa-bhooku | Aataa nishthoora mana kele niku | Kaisee saandoni ghelisaa too ||

Ovee 135

अहा पिंगलें माझे शयनीं । होतीस मृदुभाषणें करुनी । पाहतां उर्वशी दिसे नयनीं । संतोष माझा होतसे ॥

Transliteration

Ahaa Pingale maajhe shayanee | Hoteesa mridu-bhaashane karunee | Paahataa Urvashee dise nayanee | Santosha maajhaa hotase ||

Ovee 136

ऐसें पाहुनि सुगंध द्रव्य मी । रुंजी घालीं षट्पदकामीं । ऐसें सुख सरितासंगमीं । सुख कोठें पाहूं आतां ॥

Transliteration

Aise paahuni sugandha dravya mee | Runjee ghaalee shatpada-kaamee | Aise sukha saritaa-sangamee | Sukha kothe paahoo aataa ||

Ovee 137

यापरी पिंगले तव गुण । दयेचें भांडार मुक्त करुन । कीं जगाचें करिसी पालन । धर्मानुकूळें सर्वस्वी ॥

Transliteration

Yaaparee Pingale tava gunu | Dayeche bhaandaara mukta karunu | Kee jagaache karisee paalanu | Dharmaa-nukoole sarvasvee ||

Ovee 138

ऐसिया प्रज्ञेचे पहुडपण । पिंगले कोठें मी जाऊन । ऐसें म्हणूनि धडाडून । धरणीं अंग सांडीतसें ॥

Transliteration

Aisiyaa prajnyeche pahuda-panu | Pingale kothe mee jaunu | Aise mhanuni dhadaadunu | Dharanee anga saandeetase ||

Ovee 139

यापरी सर्व जाणोनि लोक । रायाचा पाहूनि शोक । गहिंवर येतसे आणीक । शोकशब्देंकरुनियां ॥

Transliteration

Yaaparee sarva janoni loku | Raayaachaa pahuni shoku | Gahivara yetase aaneeku | Shoka-shabden-karuniyaa ||

Ovee 140

कीं तरु मलयागरा । गंधी मिरवती समग्रा । तैसें रायाच्या शोकपारा । शोकें व्याकुळित जाहले ॥

Transliteration

Kee taru malayaa-garaa | Gandhee miravatee samagraa | Taise raayaa-chyaa shoka-paaraa | Shoke vyaakulita jaahle ||

Ovee 141

असो हा ग्रामांत वृत्तान्त सकळां । कळला परी सुखवसा झाला । जैसा प्राण जावोनि आला । शवशरीरा पुन्हां कीं ॥

Transliteration

Aso haa graamaanta vrittaanta sakalaa | Kalalaa paree sukhavasaa jhaalaa | Jaisaa praana jaavoni aalaa | Shava-shareeraa punhaa kee ||

Ovee 142

मग गावींचे ग्रामजन । स्मशानाजवळी आले धांवोन । परी रायाचा शोक पाहून । तेही तैसेचि होती पैं ॥

Transliteration

Maga gaaveenche graama-janu | Smashaana-javalee aale dhaavonu | Paree raayaachaa shoka pahunu | Tehee taisechi hotee pai ||

Ovee 143

परी तो मायिक सहजस्थितीं । दुःखरहित शोकावरती । जैसे बहुरुपी खेळाप्रती । शूरत्व मिरवती अपार ॥

Transliteration

Paree toh maayika sahaja-stheetee | Duhkha-rahita shokaavaratee | Jaise bahurupee khelaapratee | Shooratva miravatee apaaru ||

Ovee 144

कीं गुजरदेशीं चाल सघन । रुदन घेती मोल देऊन । तैसे घरचे सर्व जन । येती प्रेतसंस्कार करावया ॥

Transliteration

Kee gujara-deshee chaala saghanu | Rudana ghetee mola deunu | Taise gharache sarva janu | Yetee preta-sanskaara karaavayaa ||

Ovee 145

तन्न्यायें शोक करीत । राव पडला शोकार्णवांत । न वर्णवे तो आकांत । अल्प येथें वर्णिला ॥

Transliteration

Tannyaaye shoka kareetu | Raava padalaa shokaar-navaantu | Na varnave toh aakaantu | Alpa yethe varnilaa ||

Ovee 146

असो ऐसी रुदनस्थिती । ज्याची त्याला माया चित्तीं । परी ते लोक अभावनीतीं । समजाविती रायातें ॥

Transliteration

Aso aisee rudana-stheetee | Jyaachee tyaalaa maayaa chittee | Paree tey loka abhaava-neetee | Samajaavitee raayaate ||

Ovee 147

तुम्ही सर्वज्ञ सकळराशी । बोध करितां अन्य जनांसी । होऊनि गेलें होणारासी । आश्चर्य याचें कायसें ॥

Transliteration

Tumhee sarva-jnya sakala-raashee | Bodha karitaa anyas janaansee | Houni gele honaaraasee | Aashcharya yaache kaayase ||

Ovee 148

म्हणती महाराजा भविष्योत्तर । होऊनि गेलें तें होणार । तयाचा शोक करणें चतुर । योग्य आम्हां दिसेना ॥

Transliteration

Mhanatee Mahaaraajaa bhavishyot-taru | Houni gele tey honaaru | Tayaachaa shoka karane chaturu | Yogya aamhaa disenaa ||

Ovee 149

अशाश्वताचा शोक करणें । तरी काय शाश्वत आपुलें जिणें । पिंगला गेली आपणही जाणे । कदाकाळीं सुटेना ॥

Transliteration

Ashaash-vataachaa shoka karane | Taree kaya shaashvata aapule jine | Pingalaa gelee aapanahee jaane | Kadaa-kaalee sutenaa ||

Ovee 150

पहा आपुले पूर्वज अपार । मृत्यु पावले समग्र । एकामागें एक सर्वत्र । गेले न राहिले मेदिनीं ॥

Transliteration

Pahaa aapule poorvaja apaaru | Mrityu paavale samagru | Ekaamaage eka sarvatru | Gele na raahile medinee ||

Ovee 151

कीं आजा गेला नातू उरला । ऐसा कोणीं पाहिला । तरी अशाश्वताचा घट भरला । रिता होय क्षणमात्रें ॥

Transliteration

Kee aajaa gelaa naatoo uralaa | Aisaa konee paahilaa | Taree ashaash-vataachaa ghata bharalaa | Ritaa hoya kshanamaatre ||

Ovee 152

तरी हें सकळ अशाश्वतपण । पूर्ण मानिती ज्ञानवान । तरी तयाचा शोक करुन । व्यर्थें जीवा कष्टवितां ॥

Transliteration

Taree hey sakala ashaash-vatapanu | Poorna maanitee jnyaana-vanu | Taree tayaachaa shoka karunu | Vyarthe jeevaa kashtavitaa ||

Ovee 153

अहा पाहती जपी तपी । सिद्ध साधक नानारुपी । शांकोण वांचले देहसंकल्पीं । मृत्युभुवनीं महाराजा ॥

Transliteration

Ahaa paahatee japee tapee | Siddha saadhaka naanaa-rupee | Shaankona vaanchale deha-sankalpee | Mrityu-bhuvanee Mahaaraajaa ||

Ovee 154

तरी जी जी जाईल घडी । ती सुखाचीच मानावी प्रौढी । ईश्वर नामीं ठेवूनि गोडी । चित्त स्थिर असावें ॥

Transliteration

Taree jee jee jaaeela ghadee | Tee sukhaa-cheecha maanaavee praudhee | Eeshvara naamee thevuni godee | Chitta sthira asaave ||

Ovee 155

ऐसें बोधितां सर्वही जग । युक्तीप्रयुक्तीं नानाबोध । परी रायाचें हृदय चांग । शोककाजळी उजळेना ॥

Transliteration

Aise bodhitaa sarvahee jagu | Yuktee-prayuktee naanaa-bodhu | Paree raayaache hridaya chaangu | Shoka-kaajalee ujalenaa ||

Ovee 156

मग ते ग्रामींचे सकळ जन । थकित झाले बोध करुन । एकामागें एक उठोन । आपुल्या सदना सेविती ॥

Transliteration

Maga tey graameenche sakala janu | Thakita jhaale bodha karunu | Ekaamaage eka uthonu | Aapulyaa sadanaa sevitee ||

Ovee 157

असो तीही लोटली रात्री । उदया आला गभस्ती । पिंगलाचितेची पाहूनि शांती । पावक झाला अदृश्य ॥

Transliteration

Aso teehee lotalaa raatree | Udayaa aalaa gabhastee | Pingalaa-chitechee pahuni shaantee | Paavaka jhaalaa adrishyu ||

Ovee 158

मग तो मानूनि दुसरा दिन । पुन्हां पातले आप्तजन । उत्तरक्रिया संपादोन । अस्थिमीलन केलें तैं ॥

Transliteration

Maga toh maanuni dusaraa dinu | Punhaa paatle aapta-janu | Uttara-kriyaa sampaadonu | Asthi-meelana kele tai ||

Ovee 159

तें भर्तरीरावें पाहून । चित्तीं विचार करितां पूर्ण । घेऊं देईना अस्थिसंचयन । स्पर्श कोणा न करवी ॥

Transliteration

Tey Bhartaree-raave pahunu | Chittee vichaara karitaa poornu | Gheoo daeenaa asthi-sanchayanu | Sparsha konaa na karavee ||

Ovee 160

आपण बैसूनि चिता रक्षीत । कोणा लावूं देईना हात । मग ते आप्त जन समस्त । पुन्हां गेले माघारे ॥

Transliteration

Aapana baisuni chitaa raksheetu | Konaa laavoo daeenaa haatu | Maga tey aapta jana samastu | Punhaa gele maaghaare ||

Ovee 161

परी तो राव तैसाचि चितेंत । बैसता झाला दिवसरात । अन्नपाणी त्यजूनि समस्त । पिंगला पिंगला म्हणतसे ॥

Transliteration

Paree toh raava taisaachi chitentu | Baisataa jhaalaa divasa-raatu | Anna-paanee tyajuni samastu | Pingalaa Pingalaa mhanatase ||

Ovee 162

मग हें निर्वाणींचें वर्तमान । मिथुळेसी दूत सांगती जाऊन । राव विक्रम करितां श्रवण । निघता झाला तेथोनी ॥

Transliteration

Maga hey nirvaaneenche vartamaanu | Mithulesee doota saangatee jaunu | Raava Vikrama karitaa shravanu | Nighataa jhaalaa tethonee ||

Ovee 163

सत्यवर्मादि शुभविक्रम । विक्रमादि सुमति प्रधान । परम शोकार्णव रचून । अवंतिके पातले ॥

Transliteration

Satya-varmaadi Shubha-vikramu | Vikramaadi sumati pradhaanu | Parama shokaarnava rachunu | Avantike paatale ||

Ovee 164

मग येतांचि स्मशानवाटीं । पिंगला आणूनि चित्तदृष्टी । परम शोकें जाहला कष्टी । शोकसिंधूंत निमग्न ॥

Transliteration

Maga yetaanchi smashaana-vaatee | Pingalaa anuni chitta-drishtee | Parama shoke jaahalaa kashtee | Shoka-sindhoonta nimagnu ||

Ovee 165

आठवी कन्येचे सर्व गुण । म्हणे मम हातींचें गेलें निधान । विक्तम म्हणे मम गृहींचें रत्न । काळतस्करें नेलें कीं ॥

Transliteration

Aathvee kanyeche sarva gunu | Mhane mama haateenche gele nidhaanu | Vikrama mhane mama griheenche ratnu | Kaala-taskare nele kee ||

Ovee 166

अहा माउली उभयकुळांत । तारक झाली भवसरितेंत । पुन्हां दीपाची लावी वात । अदृष्य कैसी झाली वो ॥

Transliteration

Ahaa maaulee ubhaya-kulaantu | Taaraka jhaalee bhava-saritentu | Punhaa deepaachee laavee vaatu | Adrishya kaisee jhaalee vo ||

Ovee 167

अहा स्त्रीकटकीं अंतःपुरीं । मुख्य मिरवीत होती सज्ञानलहरी । जैसा हस्ती चमूभीतरी । चांगुलपण दावीतसे ॥

Transliteration

Ahaa stree-katakee antah-purei | Mukhya miraveeta hotee sajnyaana-laharee | Jaisaa hastee chamoo-bheetaree | Chaangula-pana daaveetase ||

Ovee 168

रुपवंत गुणवंत । सर्व लक्षणीं ज्ञानवंत । सूचक सदा सर्वकाळ संगोपीत । चित्त सकळांचें लक्षी कीं ॥

Transliteration

Rupavanta gunavantu | Sarva lakshanee jnyaana-vantu | Soochaka sadaa sarva-kaala sangopeetu | Chitta sakalaanche lakshee kee ||

Ovee 169

ऐसे आठवोनि नाना गुण । शोक करी अति दारुण । मग विक्रम नृपति पुढें होऊन । भर्तरीलागीं समजावी ॥

Transliteration

Aaise aathovoni naanaa gunu | Shoka karee ati daarunu | Maga Vikrama nripati pudhe hounu | Bhartaree-laagee samajaavee ||

Ovee 170

नाना युक्ती नाना वचन । भर्तरीचें बोधी मन । परी तो नायके पिसाटपण । पिंगला वदतसे ॥

Transliteration

Naanaa yuktee naanaa vachanu | Bhartaree-che bodhee manu | Paree toh naayake pisaata-panu | Pingalaa Pingalaa vadatase ||

Ovee 171

परी राव बोध करितां उत्तम । लोटूनि गेला दिन दशम । मग विक्रमें उत्तरक्रिया करुन । शुचिर्भूत जाहला ॥

Transliteration

Paree raava bodha karitaa uttamu | Lotuni gelaa dina dashamu | Maga Vikrame uttara-kriyaa karunu | Shuchir-bhoota jaahalaa ||

Ovee 172

यापरी पुढें तेरावें दिवशीं । जातिभोजन दानमानेंसीं । सर्व उरकोनि राज्यासनासी । घेऊनि राव बैसला ॥

Transliteration

Yaaparee pudhe teraave divashee | Jaati-bhojana daana-maanensee | Sarva urakoni raajyaasanaasee | Gheuni raava baisalaa ||

Ovee 173

भर्तरी न सोडी स्मशानवाटिका । धरुनि बैसला अचळ निका । जैसा वृंदे धरुनि हेका । विष्णु बैसला स्मशानीं ॥

Transliteration

Bhartaree na sodee smashaana-vaatikaa | Dharuni baisalaa achala nikaa | Jaisaa vrinde dharuni hekaa | Vishnu baisalaa smashaanee ||

Ovee 174

ऐसेपरी अचलपण । मिरवता झाला मित्रनंदन । परी नित्य नित्य विक्रम येऊन । बोध त्यातें करीतसे ॥

Transliteration

Aise-paree achala-panu | Miravataa jhaalaa Mitra-nandanu | Paree nitya nitya Vikrama yeunu | Bodha tyaate kareetase ||

Ovee 175

ऐसा बोध करितां नित्य । द्वादश वर्षें लोटली सत्य । पूर्ण तृण भक्षूनि जीवित । उदक आहारें राखिलें ॥

Transliteration

Aisaa bodha karitaa nityu | Dvaadasha varshe lotalee satyu | Parna trina bhakshuni jeevitu | Udaka aahaare raakhile ||

Ovee 176

अहा देवा अनाथनाथा । कैसें केलें त्वां अनंता । पिंगला माझी सगुण कांता । तूतें कैसी आवडली ॥

Transliteration

Ahaa devaa anaatha-naathaa | Kaise kele tvaa anantaa | Pingalaa maajhee saguna kaantaa | Toote kaisee aavadalee ||

Ovee 177

ऐसें म्हणोनि नामोच्चार । शोक करीतसे वारंवार । रात्रंदिवस चित्तीं विसर । पिंगलेचा पडेना ॥

Transliteration

Aise mhanoni naama-ucchaaru | Shoka kareetase vaaramvaaru | Raatran-divasa chittee visaru | Pingalechaa padenaa ||

Ovee 178

कृश शरीर झालें तेणें । कंठीं उरलासे प्राण । मुखीं आणूनि हरीचें नाम । शोकें पिंगला वदतसे ॥

Transliteration

Krisha shareera jhaale tene | Kanthee uralaase praanu | Mukhee anuni hareeche naamu | Shoke Pingalaa vadatase ||

Ovee 179

ऐसीं लोटलीं द्वादश वर्षें । शुचिष्मंत झालें शरीर । तें पाहूनियां अति क्लेश । मित्रावरुणी द्रवलासे ॥

Transliteration

Aisee lotalee dvaadasha varshe | Shuchish-manta jhaale shareeru | Tey pahuniyaa ati kleshu | Mitraa-varunee dravalaase ||

Ovee 180

पुत्रमोहाचें अपार भरतें । लोट लोटले चित्तसरिते । मग मित्रावरुणी तुष्टोंनि मनांत । अत्रिजानिकटीं पातला ॥

Transliteration

Putra-mohaache apaara bharate | Lota lotale chitta-sarite | Maga Mitraa-varunee tushtoonni manaantu | Atrija-nikatee paatalaa ||

Ovee 181

तंव तो प्राज्ञिक अत्रिनंदन । मित्रावरुणीसी सन्मान देऊन । म्हणे महाराजा कामना कोण । धरुनि येथें आलासी ॥

Transliteration

Tava toh praajnyika Atri-nandanu | Mitraa-varuneesee sanmaana deunu | Mhane Mahaaraajaa kaamanaa konu | Dharuni yethe aalaasee ||

Ovee 182

येरी म्हणे जी द्विजोत्तमा । ज्ञानलतिकेच्या फलद्रुमा । जाणत असूनि पुससी आम्हां । अज्ञानत्व घेऊनी ॥

Transliteration

Yeree mhane jee dvijot-tamaa | Jnyaana-latikechyaa phala-drumaa | Jaanata asuni pusasee aamhaa | Ajnyaanatva gheuunee ||

Ovee 183

तरी तव शिष्य जो भर्तरी । त्याची कैसी झाली परी । तें हृदयीं आणूनि हितातें वरीं । विलोकी कां महाराजा ॥

Transliteration

Taree tava shishya jo Bhartaree | Tyaachee kaisee jhaalee paree | Tey hridayee anuni hitaate varee | Vilokee kaa Mahaaraajaa ||

Ovee 184

मग तो महाराज ज्ञानवान । हृदयीं पाहे विचारुन । तों विपत्काळीं शोकेंकरुन । भर्तरीनाथ मिरवला ॥

Transliteration

Maga toh Mahaaraaja jnyaana-vaanu | Hridayee paahe vichaarunu | Toh vipat-kaalee shoken-karunu | Bhartaree-naatha miravalaa ||

Ovee 185

अति क्लेश तयाचे पाहून । परम द्रवला मोहेंकरुन । मग मित्रावरुणीतें बोले वचन । चिंता न करीं महाराजा ॥

Transliteration

Ati klesha tayaache pahunu | Parama dravalaa mohen-karunu | Maga Mitraa-varuneete bole vachanu | Chintaa na karee Mahaaraajaa ||

Ovee 186

तुम्हीं जावें स्वस्थानासी । मी भर्तरीचे आहे उद्देशीं । स्वहित करीन चिंता मानसीं । पाळूं नका महाराजा ॥

Transliteration

Tumhee jaave svasthaanaasee | Mee Bhartareeche aahe uddeshee | Svahita kareena chintaa maanasee | Paaloo nakaa Mahaaraajaa ||

Ovee 187

माझा शिष्य जो मच्छिंद्रनाथ । तयाचा गोरक्ष प्रज्ञावंत । तो महीं भ्रमतो करीत तीर्थ । येथें येईल महाराजा ॥

Transliteration

Maajhaa shishya jo Machchindra-Naathu | Tayaachaa Goraksha praajnya-vantu | Toh mahee bhramato kareeta teerthu | Yethe yaeela Mahaaraajaa ||

Ovee 188

तो परम आहे प्रज्ञावान । तयासी तेथें पाठवीन । तो नाना प्रयुक्तीं करुन । शुद्धपंथा आणील कीं ॥

Transliteration

Toh parama aahe prajnyaa-vaanu | Tayaasee tethe paathaveenu | Toh naanaa prayuktee karunu | Shuddha-panthaa aaneela kee ||

Ovee 189

ऐसें बोलतां मित्रावरुणीसी । संतोषें मिरवला तो चित्तासी । मग पुसूनि अनसूयात्मजासी । स्वस्थानासी पैं गेला ॥

Transliteration

Aise bolataa Mitraa-varuneesee | Santoshe miravalaa toh chittaasee | Maga pusuni Anasooyaa-tmajaasee | Svasthaanaasee pai gelaa ||

Ovee 190

यावरी पुढील अध्यायीं कथा सुंदर । अध्यात्मदीपिका मनोहर । मालू सांगे धुंडीकुमर । नरहरिकृपेंकरोनियां ॥

Transliteration

Yavaree pudheela adhyaayee kathaa sundaru | Adhyaatma-deepikaa manoharu | Maaloo saange Dhundee-kumaru | Narahari-kripen-karoniyaa ||

Ovee 191

दत्त सांगेल गोरक्षनाथा । गोरक्ष येऊनि विरहसरिता । शोषण करील तत्त्वतां । घटोद्भवाचे कृपेनें ॥

Transliteration

Datta saangela Goraksha-Naathaa | Goraksha yeuni viraha-saritaa | Shoshana kareela tattvataa | Ghatodbha-vaache kripene ||

Ovee 192

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । अष्टविंशतितमाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti shree-bhakti-kathaa-saaru | Sammata Goraksha-kaavya kimayaa-gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Ashta-vinshati-tamaadhyaaya goda ha ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu

Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार अष्टविंशतितमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Ashtavimshatitama Sampurnah